# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ ४८२४/२०२३** **पुणे दिनांक -२९/०५/२०२३**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी काही पार्किंगचे निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत आहेत.

**येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **एअर पोर्ट रोडवर नागपुरचाळ गल्ली नंबर १ ते नागपुरचाळ गल्ली नंबर ४ पर्यंत व एअरपोर्ट रोडवर पोस्ट ऑफीस चौक ते जेलरोड पोलीस चौकी पर्यंत येरवडा कारागृहाचे सुरक्षा भिंती लगत नो पार्कींग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – **३०/०५**/२०२३ ते दिनांक – **१३/०६**/२०२३ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति